आयुक्त कार्यालय
सोलापूर महानगरपालिका
इंद्रभुवन, रेल्वे लाईन,सोलापूर.४१३००१
दुरध्वनी -०२१७-२७४०३००
जा.क्र./नआ/वै/७४५
दि.०९ जानेवारी २०२२

# -: आदेश :-

**विषय: श्री सिध्दरामेश्वर यात्रा २०२२ नियोजना बाबत.**
**संदर्भ:**

१) भारतीय साथ रोग अधिनियम १८९७.
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ६५ (१) (ब)
३) महाराष्ट्र शासन सार्व.आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.१४ मार्च २०२०.
४) क्रमांकः डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१/ महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २७/११/२०२१ रोजीचे आदेश.
५) क्रमांकः डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१/ महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २४/१२/२०२१ रोजीचे आदेश.
६) क्रमांकः डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१/ महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ३०/१२/२०२१ रोजीचे आदेश.
७) जा.क्र./नआ/वै/६७४ दि.२१/१२/२०२१ रोजीचे या कार्यालयाचे आदेश.
८) जा.क्र..२०२१/मशा/कार्या-४/नैआ/जिनिक/प्र.क्र.११७/आरआर-२४७८ दि.२४/१२/२०२१ रोजीचे आदेश.
९) क्र.आव्यप्र-२०२१/प्र.क्र.३२९/आव्यप्र-१ आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग दि.०७/०१/२०२२ चे आदेश.
१०)जा.क्र..२०२१/मशा/कार्या-४/नैआ/जिनिक/प्र.क्र.११७/आरआर-५५ दि.०८/०१/२०२१ चे आदेश.

ज्याअर्थी, श्री सिध्दरामेश्वर यात्रेची परंपरा गेल्या ८०० ते ९०० वर्षापासूनची आहे. यावर्षीची श्री सिध्दरामेश्वर यात्रा व धार्मिक कार्यक्रम दिनांक १२ जानेवारी २०२२ ते १६ जानेवारी २०२२ या कालावधीत संपन्न होत असून, या कालावधीत रितीरिवाजाप्रमाणे नंदिध्वज मिरवणूक व त्याअनुषंगिक विविध धार्मिक कार्यक्रम होत असतात. या यात्रा कालावधीतील असलेल्या प्रथा व परंपरेबाबतची माहिती व त्यावर कोरोना विषाणूचा पार्श्वभूमीवर श्री सिध्दरामेश्वर देवस्थान समिती सोलापूर यांनी दिनांक १६/१२/२०२१ रोजी प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावावर मा.राज्य शासनाची परवानगी मिळणेकामी शासनास प्रस्ताव सादर करणेकामी मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांना दिनांक २१/१२/२०२१ रोजी विनंती करणेत आलेली होती.

ज्याअर्थी, कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, कायदा व सुव्यवस्था राखणेच्या अनुषंगाने सन २०२२ च्या श्री सिध्दरामेश्वर यात्रेस परवानगी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी दिनांक २४/१२/२०२१ रोजी शासनास सादर केला होता.

ज्याअर्थी, राज्यात शासनाने दिनांक २७/११/२०२१ चे आदेशान्वये कोविड तसेच ओमिक्रॉन विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनेची प्राधान्याने अंमलबजावणी करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर आदेशात खुल्या जागेतील कोणत्याही समारंभासाठी खुल्या जागेच्या क्षमतेच्या २५% लोकांना उपस्थितीस परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि अशा ठिकाणच्या बाबतीतील क्षमता औपचारिकपणे आधीच निश्चित केलेली नसेल तर, संबंधीत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास अशी क्षमता ठरविणेचा अधिकार असेल.

ज्याअर्थी, शहरात कायदा व सुव्यवस्था राखणेच्या अनुषंगाने सन २०२२ च्या श्री सिध्दरामेश्वर यात्रेस मान्यता मिळणेकामी मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचेकडे मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी दिनांक २४/१२/२०२१ रोजी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर केला होता.

ज्याअर्थी ,राज्यामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असल्याने दिनांक ३०/१२/२०२१ रोजी आदेश निर्गमित करणेत आले नुसार धार्मिक कार्यक्रमास बंदिस्त अथवा खुल्या जागेत उपस्थितांची कमाल मर्यादा ५० व्यक्ती इतकी करणेत आलेली असून, त्यानुसार ५० व्यक्तींच्या कमाल मर्यादेत कोविड प्रतिबंधात्मक नियमांचे काटेकोरपणे पालन करणेच्या अधिन राहून सदर यात्रा आयोजित करणेस परवानगी देण्याचा निर्णय जिल्हा प्राधिकरणाने त्यांच्या स्तरावर घ्यावा जर या व्यतिरिक्त निर्बंध लागू झाल्यास ते देखील लागू राहतील असे अवर सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांनी दिनांक ०७/०१/२०२२ रोजी मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे, यांना कळविले आहे.

ज्याअर्थी, दि.०८/०१/२०२२ रोजी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक आयोजित करणेत आली होती. श्री सिध्देश्वर यात्रा-२०२२ चे आयोजना संदर्भात प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये दि.१२ जानेवारी,२०२२ ते दि.१६ जानेवारी, २०२२ या कालावधीमध्ये होणाऱ्या सर्व धार्मिक समारंभास ५० व्यक्तींच्या कमाल मर्यादेत कोविड-१९ प्रतिबंधात्मक नियमांचे काटेकारेपणे पालन करणेचे अटीस अधिन राहून सदर यात्रा आयोजित करणेकामी आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांना आदेश पारीत करणेस सर्वानुमतं मान्यता देणेत आलेली आहे.

त्याअर्थी, मी पि.शिवशंकर, भा.प्र.से., आयुक्त, सोलापूर महानगरपालिका श्री सिध्दरामेश्वर यात्रा २०२२ साठी परवानगी देणेबाबत खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## १) यात्रेचा पहिला दिवसः १२ जानेवारी २०२२

दिनांक १२/०१/२०२२ रोजी यन्नी मज्जन हा धार्मिक विधी असतो त्यामध्ये सकाळी ८.०० वाजता उत्तर कसबा येथिल श्री मल्लिकार्जून देवळाजवळ श्री.हिरेहब्बू यांच्या निवास स्थानापासून काठयांची (नंदीध्वज) मिरवणूक निघते व त्याच दिवशी पुन्हा दुपारी १.०० वाजता श्री सिध्देश्वर मंदिरातून मिरवणूक निघून ६८ लिंगास योगदंडासह तैलाभिषेक करुन पुजा केली जाते. या काळात मिरवणूकीमध्ये मानकरी, नंदीध्वजधारक व भाविक मोठया प्रमाणात येतील त्यामुळे ओमिक्रॉन व कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव वाढू नये याचा विचार करता यन्नी मज्जन या धार्मिक मिरवणूकीस परवानगी देण्यात येणार नाही.

तथापी विधीवत धार्मिक कार्यक्रम करणेच्या अनुषंगाने दिनांक ११/०१/२०२२ रोजी मानाचे ७ नंदीध्वज अगोदरच मंदिर परिसरात ठेवून तेथेच सजविण्यात यावे. नंदीध्वज सजविणेचा कार्यक्रम श्री सिध्देरामेश्वर देवस्थान मंदिर परिसरामध्ये पुजारी, मानकरी यांच्या उपस्थितीत करणेत येवून त्याची विधीवत पुजा इत्यादी कार्यक्रम करतील.

प्रत्येक नंदीध्वजा समवेत ०५ व्यक्ती (एकूण ३५ व्यक्ती) तसेच त्यांचे सोबत इतर १५ पुजारी व मानकरी असे मिळून एकूण ५० व्यक्ती यांना परवानगी देणेत येत आहे. व त्याबाबतची यादी देवस्थान समितीने किमान ०२ दिवस आधी पोलीस विभाग यांना सादर करावी.

तसेच दिनांक १२/०१/२०२२ रोजी विविध कार्यक्रमांसाठी नंदीध्वजाची विधिवत पुजा करणेसाठी संपूर्ण कार्यक्रमात श्री सिध्देश्वर मंदिर परिसरात यात्रा काळात मानाचे ७ नंदीध्वज श्री सिध्देश्वर देवस्थानात निश्चित केलेल्या ठिकाणी ठेवणेत यावेत. यन्नीमज्जन या विधीसाठी ६८ लिंगास योगदंडासह तैलाभिषेक करणेकामी योगदंडाधारक व ७ नंदीध्वजाचे प्रत्येकी १ मानकरी यांना वाहनातून परवानगी देणेत येईल.

उपरोक्त विधिवत पुजा करताना संबंधितानी मास्कचा वापर करणे, Social Distancing चे पालन करणे, हात साबणाने स्वच्छ धुणे व आवश्यक तेथे सॅनिटायझरचा वापर करणे बंधनकारक राहिल.

सिध्देश्वर यात्रा कालावधीत शासनाने तसेच स्थानिक प्रशासनाने कोव्हिड प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशाचे पालन करणे सर्व सहभागी नागरिक, पुजारी तसेच मंदिर व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी यांचेवर बंधनकारक राहील.

## २) यात्रेचा दुसरा दिवसः १३ जानेवारी २०२२

दिनांक १३/०१/२०२२ रोजी सिध्देश्वर मंदिर परिसरातील संमती कट्टा येथील अक्षता सोहळयाच्या धार्मिक विधी असतो. त्यासाठी मानकरी व ७ नंदीध्वजासह परवानगी असलेले नंदीध्वजधारक यांचेसह संमती कट्टा येथे श्री सिध्दरामेश्वर देवस्थान येथून संमती कट्ट्यापर्यंत धार्मिक कार्यक्रमापुरते परवानगी देणेत येत आहे. अक्षता सोहळा संपल्यानंतर ६८ लिंग प्रदक्षिणाकरीता नंदीध्वज मिरवणूकीस परवानगी देणेत येणार नाही. अक्षता सोहळा कार्यक्रमासाठी मंदिर समितीकडून लसीकरणाचे २ डोस पूर्ण झालेल्या व ४८ तासाच्या आतील RT-PCR चाचणी निगेटिव्ह असलेल्या मानकऱ्यांसाठी पासेसची मागणी करणेत यावी. प्रत्येक नंदीध्वजासमवेत ०५ व्यक्ती (एकूण ३५ व्यक्ती) तसेच त्यांचेसोबत इतर १५ पुजारी व मानकरी असे एकूण मिळून ५० व्यक्ती यांना परवानगी देणेत येत आहे व त्याबाबतची यादी देवस्थान समितीने किमान ०२ दिवस आधी पोलीस विभाग यांना सादर करावी. संमती कट्टा येथील कार्यक्रम संपल्यानंतर सर्व नंदीध्वज हे श्री सिध्देश्वर मंदिर या ठिकाणी निश्चित केलेल्या ठिकाणी स्थानापन्न होतील. पोलीस आयुक्तालयाकडुन सदर ठिकाणी योग्य तो बंदोबस्त ठेवणेत यावा. तसेच शहरामध्ये वाहतूक व गर्दीवर नियंत्रण ठेवणेसाठी आवश्यक ती उपाययोजना पोलीस आयुक्त सोलापूर शहर हे वेळोवेळी आवश्यक ते आदेश निर्गमित करतील.

उपरोक्त विधीवत पुजा करताना संबंधीतांनी मास्कचा वापर करणे Social Distancing चे पालन करणे, हात साबणाने स्वच्छ धुणे व आवश्यक तेथे सॅनिटायझरचा वापर करणे बंधनकारक राहील.

सिध्देश्वर यात्रा कालावधीत शासनाने तसेच स्थानिक प्रशासनाने कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशाचे पालन करणे सर्व सहभागी नागरिक, पुजारी तसेच मंदिर व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी यांचेवर बंधनकारक राहील.

## ३) यात्रेचा तिसरा दिवसः १४ जानेवारी २०२२

दिनांक १४/०१/२०२२ रोजी नंदीध्वजासह तिळ व हळदीचे उटणेचे लेपन करुन मंदिर परिसरातील तलावामध्ये गंगास्नान घालण्याचा धार्मिक कार्यक्रम असतो. या कार्यक्रमासाठी योगदंडाचे मानकरी यांना नंदीध्वज विरहित विधी करण्यास परवानगी असेल. तसेच त्यांचे सोबत वरीलप्रमाणे निश्चित केलेल्या एकूण ५० व्यक्ती यांना परवानगी देवून मंदिर परिसरातच प्रस्तुत विधी करणेस परवानगी देणेत येत आहे व त्याबाबतची यादी देवस्थान समितीने ०२ दिवस आधी पोलीस विभाग यांना सादर करावी.

दिनांक १२/०१/२०२२ ते दिनांक १६/०१/२०२२ या कालावधीमध्ये नंदीध्वज हे श्री सिध्देश्वर मंदिर येथे स्थिर राहतील. केवळ मंदिर परिसराच्या भागामध्ये हलविणेस परवानगी राहील. दिनांक १४/०१/२०२२ रोजी सायंकाळी पहिल्या नंदीध्वजास नागफणी बांधून व इतर नंदीध्वजास बाशिंग व सजावट करता येईल. त्यानंतर नंदीध्वजाच्या मिरवणूकीस परवानगी देणेत येणार नाही. होम मैदान येथे होम प्रदिपन कार्यक्रमासाठी नंदीध्वज विरहीत योगदंडासह श्री सिध्देश्वर मंदिर पासून फडकुले सभागृहाच्या बाजूच्या रस्त्याने नॉर्थकोटकडे असलेल्या मार्गाकडून होम मैदानावर प्रवेश करतील. तेथून होम मैदानावर होम कुंडाजवळ निश्चित केलेल्या योगदंडधारक व मानकरी यांचेसह औपचारिकता म्हणून सदर विधीस उपस्थित राहणेस परवानगी देणेत येत आहे. योगदंडसमवेत एकूण ३५ व्यक्ती तसेच त्यांचे सोबत इतर १५ पुजारी व मानकरी असे मिळून एकूण ५० व्यक्ती यांना परवानगी देणेत येत आहे. सदर ठिकाणी परवानगी व्यतिरीक्त इतर भाविक येणार नाहीत याची दक्षता घेणेबाबत श्री सिध्देश्वर मंदिर पंच कमिटी नियोजन करतील. होम हवन विधी कार्यक्रम संपल्यानंतर योगदंड हे श्री सिध्देश्वर मंदिर या ठिकाणी निश्चित केलेल्या ठिकाणी स्थानापन्न होतील. पोलीस आयुक्तांलयाकडून सदर ठिकाणी योग्य तो बंदोबस्त ठेवणेत येईल. तसेच शहरामध्ये वाहतूक व गर्दीवर नियंत्रण ठेवणेसाठी आवश्यक ती उपाययोजना पोलीस आयुक्त सोलापूर शहर हे वेळोवेळी आवश्यक ते आदेश निर्गमित करतील.

उपरोक्त विधीवत पुजा करताना संबंधीतांनी मास्कचा वापर करणे सोशल डिस्टन्सिंग चे पालन करणे, हात साबणाने स्वच्छ धुणे व आवश्यक तेथे सॅनिटायझरचा वापर करणे बंधनकारक राहील.

सिध्देश्वर यात्रा कालावधीत शासनाने तसेच स्थानिक प्रशासनाने कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशाचे पालन करणे सर्व सहभागी नागरिक, पुजारी तसेच मंदिर व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी यांचेवर बंधनकारक राहील.

## ४) यात्रेचा चौथा दिवसः १५ जानेवारी २०२२

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होवू नये यासाठी होम मैदान येथील दिनांक १५ जानेवारी २०२२ रोजी होणाऱ्या शोभेच्या दारु कामासाठी परवानगी देणेत येणार नाही.

## ५) यात्रेचा पाचवा दिवसः १६ जानेवारी २०२२

दिनांक १६/०१/२०२२ रोजीचे कप्पडकळी कार्यक्रम मिरवणूकीस परवानगी देणेत येणार नाही.

कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव विचारात घेता नंदीध्वजाची नगर प्रदिक्षणा मिरवणूक न काढता प्रतिकात्मक स्वरुपात श्री सिध्दरामेश्वर योगदंड घेऊन मंदिर परिसरात पार पाडतील. सदर नंदीध्वजासमवेत ०५ व्यक्ती (एकूण

३५ व्यक्ती) तसेच त्यांचे सोबत इतर १५ पुजारी व मानकरी असे मिळून एकूण ५० व्यक्ती यांना परवानगी देणेत येत आहे. व त्याबाबतची यादी देवस्थान समितीने किमान ०२ दिवस आधी पोलीस विभाग यांना सादर करावी. संपूर्ण यात्रा कालावधीत दिनांक १२/०१/२०२२ ते दिनांक १६/०१/२०२२ या कालावधीत सर्व नंदीध्वज हे श्री सिध्देश्वर मंदिर परिसरातच निश्चित केलेल्या ठिकाणी स्थानापन्न होतील.

उपरोक्त विधीवत पुजा करताना संबंधीतांनी मास्कचा वापर करणे सोशल डिस्टन्सिंग चे पालन करणे, हात साबणाने स्वच्छ धुणे व आवश्यक तेथे सॅनिटायझरचा वापर करणे बंधनकारक राहील.

सिध्देश्वर यात्रा कालावधीत शासनाने तसेच स्थानिक प्रशासनाने कोव्हिड प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशाचे पालन करणे सर्व सहभागी नागरिक, पुजारी तसेच मंदिर व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी यांचेवर बंधनकारक राहील.

**६) भाविकांचे मंदिर प्रवेशाबाबत -**

दिनांक १२/०१/२०२२ ते दिनांक १६/०१/२०२२ या कालावधीत दर्शनाकरीता येणाऱ्या भाविकांकरीता ऑनलाईन (Online) दर्शन पासची सुविधा मंदिर समिती उपलब्ध करुन देईल. तसेच दर्शनाकरीता सकाळी ८.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत एकावेळी फक्त ५० भाविकच मंदिर परिसरात असतील याची दक्षता मंदिर समिती घेईल. दर्शनाकरीता येणाऱ्या भाविकांचे लसीचे २ डोस झालेले असावेत.

यात्रा कालवधीत श्री सिध्देश्वर मंदिर भाविकांना केवळ मुखदर्शनासाठी खुले राहिल. तथापी देवस्थान कडून पंरपरेनुसार चालत राहिलेल्या सर्व नित्योपचार देवस्थान मार्फत करण्यात यावेत. मंदिरात भाविकांची गर्दी होणार नाही. याकरीता देवस्थान समिती सोलापूर यांचेमार्फत खाजगी सुरक्षारक्षक नेमणेत यावेत. याबाबतच्या माहितीसह सुरक्षारक्षकांची यादी मंदिर समितीने पोलिस व महानगरपालिका प्रशासनास दयावी

**७) इतर उपाययोजना**

१. सन २०२२ च्या श्री सिध्दरामेश्वर यात्रेस दैनंदिन स्वरुपात हजारो भाविक उपस्थित राहून यात्रेत जमलेल्या जनसमुदायांच्या माध्यमातून कोविड १९ विषाणूंचा संसर्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासन आदेश दिनांक २७/११/२०२१ अन्वये ठरवून दिलेल्या मानक प्रणाली (Standard Operating Procedure SOP) चे अनुपालन होते अगर कसे याबाबतची सुनिश्चिती करण्यासाठी यात्रेच्या परिसरात आवश्यक ती पोलीस यंत्रणा कार्यान्वित टेवण्याची तजवीज करणेकामी योग्य ते आदेश पोलीस आयुक्त सोलापूर शहर यांनी करावे. तसेच स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करावी.

२. राज्यातील कोविड-१९ व ओमिक्रॉनची पार्श्वभूमी व जगभरात आढळून आलेले नवे स्वरुप व संसर्ग याबाबी विचारात घेऊन सामाजिक उत्तदायित्वाचे भान ठेवून यात्रा प्रतिकात्मक, मर्यादीत व साध्या पध्दतीने साजरा करणेबाबत व यात्रेमध्ये मोठ्या प्रमाणात जमाव एकत्रित होईल अशा कार्यक्रमांवर बंदी असेल याची सर्व खबरदारी देवस्थान समितीने घ्यावयाची आहे. यात्रेदरम्यान श्री सिध्दरामेश्वर देवस्थान येथील धार्मिक कार्यक्रम, नंदीध्वजाची पुजा, मिरवणूक, आरती, महापूजा, यांचे थेट प्रक्षेपण फेसबूक लाईव्ह, यु-ट्युब, तसेच मोबाईल ॲप या समाजमाध्यमांद्वारे करण्यात यावे. तसेच जास्तीत जास्त भाविकांनी समाजमाध्यमाद्वारे

यात्रेतील कार्यक्रम पाहणेबाबत आवाहन देवस्थान समितीच्या वतीने करणेत यावे. श्री सिध्दरामेश्वर यात्रेमध्ये सर्व सामान्य भाविकांना सहभागी होता येणार नसल्यामुळे मंदिरामधील सर्व कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण करण्याची व्यवस्था प्रमुख विश्वस्थ श्री सिध्दरामेश्वर देवस्थान सोलापूर यांनी पोलीस आयुक्त सोलापूर शहर यांच्या निर्देशानुसार करावी.

३. श्री सिध्दरामेश्वर यात्रेच्या अनुषंगाने आरोग्य विषयक तपासणी, मास्क सॅनिटायझरचा वापर, मंदिर व मंदिर परिसर वेळोवेळी निर्जंतुकीकरण करण्याची कार्यवाही श्री सिध्दरामेश्वर देवस्थान समिती मार्फत करणेत यावे.

४. यात्रा कालावधीत श्री सिध्दरामेश्वर मंदिरात भाविकांना केवळ मुख दर्शनाची परवानगी राहील. त्याकरीता ऑनलाईन दर्शन पास उपलब्ध करुन घेणे आवश्यक राहील

५. सन २०२२ च्या श्री सिध्दरामेश्वर यात्रेदरम्यान उपरोक्त संदर्भामध्ये नमूद केलेल्या शासन आदेश दिनांक २७/११/२०२१ व त्यानंतर वेळोवेळी निश्चित केलेल्या मानक कार्यप्रणाली (Standard Operating Procedure SOP) चे पालन करणे सर्व संबंधीतावर बंधनकारक राहील.

६. कोविड १९ व ओमिक्रॉन संसर्गाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या नगर विकास विभाग, मदत व पुनर्वसन विभाग, आरोग्य विभाग, जिल्हाधिकारी, स्थानिक व सर्व संबंधीत नगरपालिका, पोलीस प्रशासन यांनी वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. श्री सिध्दरामेश्वर यात्रा कोविड १९ व ओमिक्रॉन विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करणेत येत आहे. सदर यात्रेस ८०० ते ९०० वर्षाची परंपरा असल्याने सदर कोविड -१९ व ओमिक्रॉन संसर्गामुळे प्रतिबंध होऊ नये यादृष्टिने आवश्यक ती खबरदारी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे पोलीस आयुक्त, महानगरपालिका प्रशासन व अध्यक्ष श्री सिध्दरामेश्वर मंदिर समिती यांनी परस्परांमध्ये समन्वय ठेवून संयुक्त जबाबदारीने यात्रा यशस्वीरित्या पार पडेल यांची सुनिश्चिती करावी. पोलीस आयुक्त यांनी याकरिता आवश्यकतेप्रमाणे साथरोग अधिनियम १८९७ आपत्कालीन व्यवस्थापन अधिनियम २००५ महाराष्ट्र राज्य कोविड-१९ विषाणू प्रतिबंधात्मक उपायोजना नियम २०२० मधील तरतुदी विचारात घेऊन आदेश निर्गमित करावेत.

८. कार्यक्रमासाठी उपस्थित राहणाऱ्या व्यक्तीस पास देणेत यावा. पासवर फोटो, नांव, पत्ता, कार्यक्रमाची तारीख व वेळ ठिकाणी नमूद असावे.

९. संबंधीतांनी पास धारकांची यादी पोलीस प्रशासनाला आगाऊ कळविणेत यावी जेणेकरुन गर्दीवर नियंत्रण ठेवता येईल.

१०. कोरोना व ओमिक्रॉन विषाणूचा प्रादुर्भाव व संक्रमण विचारात घेता यात्रा काळात मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे अखंड चालू असलेल्या परंपरेस बाधा होऊ नये या दृष्टिकोनातून ज्यांचे लसीचे २ डोस पूर्ण झाले आहेत व ज्यांची ४८ तासातील RT-PCR चाचणी निगेटिव्ह आहे अशाच यात्रेचे मानकरी, नंदी ध्वजधारक, सेवेकरी या लोकांना सहभागी होणेच्या अनुषंगाने पासेस पोलीस आयुक्त यांचेमार्फत देणेत येईल. त्याबाबतची यादी देवस्थान समितीने किमान ०२ दिवस आधी पोलीस विभाग व महापालिका यांना सादर करावी.

११. सर्व नंदीध्वजाचे अनुषंगाने होणारे सर्व (होम मैदान वगळून) धार्मिक कार्यक्रमाकरिता नंदीध्वजासमवेत ०५ व्यक्ती (एकूण ३५ व्यक्ती) तसेच त्यांचे सोबत इतर १५ पुजारी व मानकरी असे मिळून एकूण ५० व्यक्ती यांना परवानगी देवून मंदिर परिसरातच प्रस्तुत विधी करणेस परवानगी देणेत येत आहे. या ५० व्यक्तींनी लसीचे दोनही डोस घेतलेले असावेत. शिवाय धार्मिक विधीत सामिल होणेपुर्वी ४८ तासापुर्वीची ५० व्यक्तिंची RT-PCR चाचणी आवश्यक राहील.

१२. सदरच्या यात्रा कालावधीत विजापूर रोडवरील श्री रेवणसिध्देश्वर मंदिरासमोरील खुल्या जागेत जनावरांचा बाजार भरविणेस परवानगी देणेत येणार नाही.

१३. कोविड-१९ व ओमिक्रॉन चे पार्श्वभूमीवर सिध्देश्वर यात्रेसाठी बाहेरुन येणाऱ्या भाविकांना / यात्रेकरुंना सोलापूर शहरात येण्यास बंदी घालणेत येईल. सोलापूर ग्रामीण घटकातील सर्व पोलीस ठाणेच्या हद्दीत सोलापूर जिल्ह्याचे सीमेस लागून असलेल्या उस्मानाबाद, अहमदनगर, पुणे, सांगली व सातारा तसेच कर्नाटक राज्य सीमेवर योग्य प्रकारे नाकाबंदीचे नियोजन पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण यांचेमार्फत करणेत यावे.

१४. सोलापूर ग्रामीण घटकातील सर्व पोलीस ठाणे हद्दीत पोलीस अंमलदार व पोलीस पाटील यांनी कोविड १९ व ओमिक्रॉन च्या पार्श्वभूमीवर लोकांना यात्रेस न येणेबाबत प्रबोधन करणेत यावे.

१५. यात्रा काळामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम करताना संबंधीतांनी मास्कचा वापर करणे (Standard Operating Procedure SOP) चे पालन करणे बंधनकारक राहील.

१६. सर्व नंदिध्वज हे सिध्देश्वर मंदिर परिसरातच ५ हि दिवस स्थानापन्न राहतील.

१७. यात्रा कालावधीत परवाना देणेत आलेल्या मानकरी, नंदिध्वज धारक, सेवेकरी यांचे आरोग्य विषयक तपासणी होणेबाबत योग्यती उपाययोजना मंदिर समितीने करावी.

१८. कारोना विषाणूचा प्रादुर्भाव व संक्रमण विचारात घेता यात्रा काळात मोठयाप्रमाणात गर्दी होण्याची शक्यता नाकाराता येत नाही. त्यामुळे अखंड चालू असलेल्या परंपरेस बाधा येऊ नये या दृष्टीकोनातून यात्रेचे मानकरी, नंदिध्वज धारक, सेवेकरी या लोकांना सहभागी होणेच्या अनुषंगाने पासेस पोलिस आयुक्त सोलापूर शहर यांचेमार्फत देणेत येईल त्याबाबतची यादी देवस्थान समितीने किमान २ दिवस आधी पोलिस विभाग यांना सादर करावी.

१९. यात्रेनिमित्त होममैदान व सिध्दरामेश्वर मंदिर परिसरात तसेच यात्रा काळामध्ये मंदिर व मंदिर परिसरात गड्डा यात्रेच्या अनुषंगाने विविध प्रकारचे दुकाने, खादय पदार्थाचे स्टॉल, रसपानगृहे, करमणुकीचे व मनोरंजनाचे साधणे इत्यादी दुकाने थाटली जातात. कोरोना विषाणूचा पादुर्भाव लक्षात घेता सदर स्टॉल किंवा कोणत्याही दुकांनाना यात्रा कालावधीत दिनांक ३१/०१/२०२२ पर्यंत परवानगी देण्यात येऊ नये.

२०. यात्रा काळामध्ये नियमानुसार परवाना देण्यात आलेल्या पुजारी, मानकरी, नंदीध्वजधारक यांचे आरोग्य विषयक यथायोग्य तपासणी करुन घेणे अनिवार्य राहील. तसेच यात्रा काळामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमास परवानगी प्राप्त परवानाधारक यांचेसाठी मास्क व सॅनिटायझर इत्यादी वापरणे बंधनकारक राहील.

२१. सोलापूर शहरामध्ये यात्रा कालावधीमध्ये गर्दीच्या अनुषंगाने आवश्यकता भासल्यास पोलीस आयुक्त, सोलापूर शहर हे कलम १४४ बाबतचे आदेश पारित करावेत.

२२. यात्रा कालावधीत मंदिर परिसरात तसेच ज्याठिकाणी मर्यादित स्वरुपात विधी होणार आहे. त्याठिकाणी गर्दी होऊ नये यासाठी मंदिर समितीने खाजगी सुरक्षारक्षक नेमावेत.

उपरोक्त आदेशातील सर्व सुचनांचे सर्व संबंधीतांनी विहित वेळेत व बिनचूक पालन करणेसंबंधी आदेशित करणेत येत आहे. सदर आदेशात परिस्थितीनुसार बदल करण्याचे अधिकार राखून ठेवणेत येत आहे. सदर आदेशामधील कोणत्याही तरतुदीचा भंग केल्यास संबंधीतांविरुध्द साथरोग अधिनियम १८९७ आपत्कालीन व्यवस्थापन अधिनियम २००५ महाराष्ट्र राज्य कोविड १९ विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना नियम २०२० मधील तरतुदीनुसार कारवाई करणेत येईल. तसेच सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती / संस्था अथवा संघटना यांचेवर भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतूदीनुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र असून आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, साथ रोग नियंत्रण कायद्यातील तरतूदी आणि इतर कायदे आणि विनियम यानुसार कारवाई करणेत येईल. अशा व्यक्ती, संस्था अथवा संघटना यांचे विरुध्द संबंधीत पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी / विभागीय अधिकारी व अधिनस्त कर्मचारी यांनी कारवाई करावी.

सदरचा आदेश दिनांक :०९/०१/२०२२ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

स्थळ :- सोलापूर
दिनांक:-०९/०१/२०२२

MUNICIPAL COMMISSIONER OFFICE SOLAPUR

( पि.शिवशंकर,भा.प्र.से. )
आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका.

प्रति,
१) अति.आयुक्त, सो.म.पा.
२) सर्व उपायुक्त, सो.म.पा.
३) सर्व सहा.आयुक्त, सो.म.पा.
४) सर्व वरिष्ठ पोलिस निरीक्षक, शहर हद्दीतील सर्व पोलिस ठाणे, सोलापूर.
५) सर्व खाते / शाखा प्रमुख, सोलापूर महानगरपालिका.
६) श्री सिध्देश्वर देवस्थान समिती, सोलापूर.

प्रत :- माहितीस्तव सादर..
१) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
२) मा.जिल्हाधिकारी,सोलापूर.
३) मा.पोलीस आयुक्त,सोलापूर.
प्रत :- जनसंपर्क अधिकारी,

सदरचा आदेशाची माहिती सर्व नागरिकांना होणेसाठी त्यास व्यापक प्रसिध्दी देणेत यावी.